औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक १०.१.९६ रोजी झालेल्या १९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. किशनचंदजी तनवाणी | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. दे. वि. गुन उपसंचालक, नगररचना औरंगाबादविभाग, औरंगाबाद. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. भास्कर मुंढे मुख्य अधिकारी/औ. मं. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ४] श्री. गायकवाड, शहर अभियंता मनपा औरंगाबाद, आयुक्त मनपा औ'बाद | यांचे सदस्य प्रतिनिधी. |
| ५] श्री. पुंडलीक माधवराव शिंदे | सदस्य |
| ६] श्री. नारायणराव जाधव | सदस्य |
| ७] श्रीमती कमला जवाहर तुल्ले | सदस्या |
| ८] श्रीमती उषा साने | सदस्या |
| ९] श्री. सुरेंद्र कुलकर्णी | सदस्य |
| १०] श्री. गणेश माहोरे | सदस्य |
| ११] श्री. मुकेश जयस्वाल | सदस्य |
| १२] श्री. आत्मारामजी तळेकर | सदस्य |
| १३] श्री. आशोक लोंढे | सदस्य |
| १४] श्री. अनिल पोलकर | सदस्य |
| १५] श्री. सुरेश जैन | सदस्य |
| १६] श्री. सुजित ठाकूर | सदस्य |
| १७] प्रा. नंदू कुलकर्णी | सदस्य. |

नुतन मंडळाच्या सदस्यांचे परिचय करुन झाल्यावर मंडळाचे सदस्य श्री. आत्माराम तळेकर यांनी सांगितले की, हे मंडळ नविन असल्याने मुख्य अधिकारी यांनी मंडळाच्या कार्यासंबंधीची माहिती विशद करावी.

म. मुख्याधिकारी यांनी मंडळाच्या कार्याविषयी माहिती दिली की, औरंगाबाद मंडळ हे म्हाडाचे प्रादेशिक घटक म्हणून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात गृहनिर्माणाचे कार्य करते. मराठवाड्यातील इतर शहरापेक्षा औरंगाबाद येथे गृहनिर्माण योजनेस चांगला प्रतिसाद आहे. गृहनिर्माणाच्या गरजेनुसार उपविभागीय कार्यालय उघडणे किंवा बंद करणे हे मंडळाच्या अखत्यारीतील बाब असल्याचे सांगितले.

मंडळाच्या गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधण्यात येणारे गाळे व विकसीत भूखंडाचा समावेश होतो. चार विविध उत्पन्न गटांकरिता सदर योजना राबविली जाते.

| | |
|---|---|
| १] आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | कुटुंबाचे मासिक सरासरी उत्पन्न रु. १२५० पर्यन्त |
| २] अल्प उत्पन्न गट | ———"——— १२५१ ते २६५० पर्यन्त |
| ३] मध्यम उत्पन्न गट | ———"——— २६५१ ते ४४५० पर्यन्त |
| ४] उच्च उत्पन्न गट | ———"——— ४४५१ च्या वर. |

ठराव क्र. ६०४

मंडळाच्या दिनांक २१.१०.९५ च्या बैठकीचे कार्यवृत्ताचे वाचन होऊन मंडळाच्या ९३ च्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: औरंगाबाद बे मंडळाने बाभुळगांवरोड लातुर येथे बांधलेल्या अल्प उत्पन्न गट २८ गाळे व मध्यम उत्पन्न गट २२ गाळे वाटपाबाबत.

...

सदर विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता यांनी वाचुन दाखविली. यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. जैन यांनी सुचना केली की, जि.ग्रा.त.नि.मंचाने संबंधीत प्रकरणात निकाल देतांना गाळ्यांची किंमत कमी करण्याचे आदेश दिले आहेत हे मान्य नसल्यास तक्रारकर्त्यांनी भरलेल्या अनामत रक्कमेवर ७०००/- द.सा.द.शे. १८% दराने व्याज व नुकसान भरपाई पोटी रु. ३०००/-परत करावेत असे आदेश दिलेले आहेत. यासर्व परिस्थितीचा विचार करुन व नफ्यातोट्याचा विचार करुन गाळे वाटप करावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०५

बाभुळगांवरोड लातुर येथील अल्प व मध्यम उत्पन्न गट गाळ्यांची आयडीपी ही चार समान हप्त्यात तीन महिन्याच्या अंतराने व्याजासह वसुल करण्याच्या अटीवर, पहिला हप्ता भरल्यावर ताब्यात देण्यात यावा. अशा प्रकारची जाहिरात देऊन गाळे वाटप करावे. सदरचा निर्णय हा केवळ प्राधिकरणाचे हित लक्षात घेऊन घेतला आहे यास प्राधिकरणाकडून कार्योत्तर मंजूरी घ्यावी.

विषय क्र. ३: लातुर नगरपालिकेमार्फत प्राप्त झोपडपट्टीच्या प्रस्तावास लोकसंख्या वाढीव सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

...

सदर विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविण्यांत आली व मंडळास माहिती दिली की, लातुर नगरपालिकेने लातुर येथील साठेवाडी-वडारवाडा झोपडपट्टी, सिग्नल कॅम्प झोपडपट्टी व हनुमंतवाडी झोपडपट्टी या झोपडपट्ट्याचे लोकसंख्या वाढीनुसार प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झालेले आहेत. लातूर शहराकरिता सन १९९५.९६ मध्ये रु. २५.०० लक्षाची तरतुद आहे व आजपर्यन्त रु. ०.८० लक्ष रुपये खर्च झालेला आहे व नगरपरिषदेच्या हाती रु. ३९.४१ लक्षाची कामे आहेत.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०६

साठेवाडी-वडारवाडा, सिग्नल कॅम्प व हनुमंतवाडी या झोपडपट्टीतील वाढीव लोकसंख्यानुसार सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव खालील अटीवर मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

१] साठेवाडी-वडारवाडी झोपडपट्टीच्या वाढीव लोकसंख्येनुसार २४,६२,२५९/- व [२] सिग्नल कॅम्प झोपडपट्टी रु. २४,३८,९७० [३] हनुमंतवाडी झोपडपट्टीस रु. १२,९९,३००/- च्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

[२] लातूर नगरपालिकेने काम हातीघेतल्यानंतर सदरचा खर्च स्वत:च्या निधीतुन केल्यानंतरच प्रतिपुर्ती करण्यांत येईल व निधीच्या उपलब्धतेनुसार

प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून प्रतिपुर्ती करण्यांत येईल.

[३] वाढीव लोकसंख्येचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी लातूर यांचे स्वाक्षरीने यां कार्यालयास सादर करावे व नंतरच प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमीत करावेत.

विषय क्र. ४: औरंगाबादमंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी नेमण्यांत आलेल्या सिक्युरिटी सर्व्हीसेसच्या दि. ८.६.९५ ते ७.६.९६ पर्यन्त वाढविण्यांत आलेल्या करारास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविण्यांत आली व चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०७

मे. मेडीएटर्स व अजिंठा सिक्युरिटी प्रा. लिमिटेड या संस्थेस औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी दि. ८.६.९५ ते ७.६.९६ पर्यन्त मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी दि. ८.६.९५ ते ७.६.९६ पर्यन्त १ वर्षाकरिता करण्यांत आलेल्या कराराच्या कार्यवाहीस मंडळ कार्योत्तर मंजूरी देत आहे.

विषय क्र. ५: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: औरंगाबादमहानगरपालिकेतर्फे प्राप्त झोपडपट्टीच्या सुधारणा कामाच्या प्रस्तावास, लोकसंख्या वाढीनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

...

सदर विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविण्यांत आली. औरंगाबाद महानगरपालिकेने एकुण ४ झोपडपट्टीच्या वाढीव लोकसंख्येस सुविधा पुरविण्याचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव मंडळाकडे सादर केले आहे.

औरंगाबाद शहराकरिता सन १९९५-९६ करिता एकुण ८.०० लक्षाची तरतुद असुन आजपर्यन्त पुर्णपणे तरतुद शिल्लक आहे. औरंगाबाद मनपाकडे सद्यस्थिती कुठलेही काम नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केलेल्या झोपडपट्ट्या, संजयनगर, [मुकुंदवाडी] घाटी [जयभीमनगर], किलेअर्क, फुलेनगर [हर्सूल] या असुन वाढीव लोकसंख्ये-च्या चार ही झोपडपट्टीच्या प्रस्तावास वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी असे ठरले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०८

संजयनगर [मुकुंदवाडी] या झोपडपट्टीस वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता रु. ६,१३,१००/-, घाटी [जयभीमनगर] झोपडपट्टीस रु. २८,१६,०१३/- किलेआर्क रु. १,१२,५००/- व फुलेनगर [हर्सूल] या झोपडपट्टीस रु. ११,४५,४१६/- ची वाढीव लोकसंख्येनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटीवर देण्यांत येत आहे.

१] औरंगाबाद महानगरपालिकेने काम हाती घेतल्यानंतर सदरचा खर्च स्वत:च्या निधीतून केल्यानंतरच प्रतिपुर्ती करण्यांत येईल व निधीच्या उपलब्धतेनुसार

व प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून प्रतिपुर्ती करण्यांत येईल.

२) शासन नियमानुसार वाढीव लोकसंख्येचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर करावेत व नंतर मान्यतेचे आदेश निर्गमीत करावेत.

विषय क्र. २: सेलु जि. परभणी येथील सर्वे क्र. १४ मधील जमिन म्हाडातर्फे गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी खरेदी करण्याबाबत.

....

सदर विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. सन १९८३ साली प्राधिकरणाच्या धोरणानुसार प्रत्येक तालुक्यातील खाजगी वाटाघाटीने जमिन संपादन करण्याच्या कार्यवाहीचा भाग म्हणून सेलु येथील सर्वे नं. १४ पैकी जमिन संपादनासाठी म्हाडा कायदा कलम ५२ नुसार प्रक्रिया सुरु करण्यांत आली. सदर सर्व्हे क्रमांकापैकी जमिन खरेदी करण्याचा अंतिम प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठविला होता. प्राधिकरणाने सदर प्रस्तावास मान्यता दिली. त्यानंतर जमिन खरेदी करण्याची कार्यवाही करतेवेळी सदर जमिनीच्या काही भागावर आरक्षण दिसुन आले. सदरचे आरक्षण वगळुन राहिलेली जमिन खरेदी करण्याचा मंडळाने निर्णय घेतला मागील मंडळाच्या कालावधीत ठराव क्र. ५६७ बैठक क्र. ९७ अन्वये सदरची जमिन खरेदी करावी असे ठरले. तथापी सध्या परिस्थिती मागणी अभावी मंडळाच्या गेवराई, . . . , उदगीर, परभणी येथील योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही म्हणून ही जमिन खरेदी करण्याची कार्यवाही करावी किंवा नाही यास्तव मार्गदर्शनासाठी ही बाब मंडळासमोर ठेवण्यांत येत आहे. त्यावर मंडळाचे सदस्य श्री. आसाराम तळेकर यांनी विचारले की, मागणी नोंदविलेली आहे का ? व अर्ज प्राप्त झालेले आहे का ?

त्यावर मुख्याधिकारी यांनी सांगितले की, मंडळामार्फत मागणी अंदाज आजमाविण्यांत आलेला नाही. तथापी सेलु न. प. ने गृहनिर्माण योजनेसाठी पुर्वी मागणी नोंदविलेली होती व त्या मागणीनुसार जवळ जवळ ६०० अर्ज न. प. कडे प्राप्त झालेले आहे असे नगराध्यक्षांकडून कळते.

त्यावर मा. सभापतींनी श्रीमती साने यांना विचारले की, आपण परभणी भागातील रहिवाशी आहात तेंव्हा सेलु येथे सदर जागा खरेदी केल्यास गृहनिर्माण योजनेस मागणी येईल का ? व सदरची जागा गृहनिर्माण योजनेसाठी योग्य आहे का ? त्यावर श्रीमती साने यांनी सांगितले की, ही जागा रस्त्याच्याकडेला असुन गृहनिर्माण योजना राबविल्यास प्रतिसाद येईल असे वाटते.

त्यावर मा. सभापतींनी सांगितले की, मा. गृहनिर्माणमंत्रीमहोदयांनी जाहीर केलेल्या धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात गृहनिर्माण योजना राबवावयाचे शासनाचे प्रयत्न आहेत. म्हणून ही जमिन प्राधिकरणाने मान्य केलेल्या दराने खरेदी करण्यास हरकत नाही. यासर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन खालील प्रमाणे मंडळाने निर्णय घेतला.

ठराव क्र. ६०९

प्राधिकरणाने ठराव क्र. ४०९२ दि. ३०.५.९३ अन्वये सेलु येथील सर्वे क्र. १४ या जमिनीपैकी आरक्षण वगळुन रू. ५५,[illegible]००/- प्रति एकर या दराने जमिन गृहनिर्माण योजनेसाठी खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्या दरानुसार जमिनखरेदी करण्यास मंडळाने मान्यता दिली.

..

मंडळाच्या सदस्यांनी लेटर हेड व व्हीजिटींग कार्ड छापून द्यावते अशी मागणी मा. सभापती यांचेकडे केली. याबाबत मा. सभापतींनी, मुख्य अधिकारी यांना खुलासा करण्यास सांगितले.

नियमानुसार मंडळाच्या सदस्यांना लेटरहेड, व्हीजिटींग कार्ड छापून देण्याची तरतुद नाही असा खुलासा मुख्याधिकारी यांनी केला.

यावर मंडळाच्या सदस्यांनी बरीच चर्चा केली व मंडळाच्या सदस्यांना ओळख म्हणून व्हीजिटींग कार्ड व लेटर हेड छापून देण्याची शिफारस प्राधिकरणास करावी असे एकमताने ठरले. त्याप्रमाणे मंडळाच्या भावना प्राधिकरणास कळवाव्यात असे मा. सभापती यांनी सांगितले.

बैठकीचे कामकाज संपल्यानंतर मा. सभापतींच्यावतीने मुख्याधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले व श्री. आताराम तळेकर यांनी बैठकीचा समारोप केला.

....